गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

वर्ष १ ले ● अंक २६८ वा ● रविवार १८ फेब्रुवारी २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 1 | Issue 268 | Date : 18/02/2024 blow :Sunday Page 4 Price 4

## लोकसभेसाठी ३७० जागांचे लक्ष्य

### कमळाचे फूल हाच उमेदवार; पंतप्रधानांचे भाजप कार्यकर्त्यांना आवाहन

**पंतप्रधान मोदींच्या सूचना**

* १०० दिवस अथक परिश्रम घ्या, बुथ स्तरावर लक्ष केंद्रीत करा. * मोदी सरकारच्या योजनांचे महत्त्व मतदारांपर्यंत पोहोचवा * युवा, महिला, गरीब व शेतकरी या चार स्तंभांच्या विकासासाठी केंद्र सरकारने केलेल्या कामांची माहिती पोहोचवा. * पहिल्यांदा मतदार करणाऱ्या युवा मतदारांपर्यंत पोहोचा. * २०१४ पूर्वी काँग्रेसच्या १० वर्षांच्या काळातील भ्रष्टाचार, घोटाळे, धोरणलकवा यांची माहिती लोकांपर्यंत पोहोचवा.



नवी दिल्ली : 'कमळाचे फूल' हाच भाजपचा उमेदवार असून कार्यकर्त्यांनी पुढील शंभर दिवस मेहनत घेऊन आगामी लोकसभा निवडणुकीत पक्षाला ३७० जागा मिळवून द्या, हीच जनसंघाचे संस्थापक व भाजपचा वैचारिक आधार ठरलेले श्यामाप्रसाद मुखर्जी यांना आदरांजली ठरेल, असा संदेश पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भाजपच्या राष्ट्रीय पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत दिला.

'भारतमंडपम'मध्ये शनिवारी भाजपच्या दोन दिवसांच्या राष्ट्रीय अधिवेशनाला सुरुवात झाली. त्यापूर्वी मोदींच्या उपस्थितीत राष्ट्रीय पदाधिकाऱ्यांची बैठक झाली. या बैठकीमध्ये एप्रिल-मे मध्ये होणाऱ्या लोकसभा निवडणुकीची रणनितीवर चर्चा करण्यात आली. या बैठकीमध्ये मोदींनी, २०२४च्या लोकसभा निवडणुकीत पक्षाच्या ३७० जागांच्या लक्ष्याचे महत्त्व स्पष्ट केले.

शयामाप्रसाद मुखर्जी यांनी अनुच्छेद ३७० च्या माध्यमातून जम्मू-काश्मीरला विशेषाधिकार देण्याला विरोध केला. मोदी सरकारने ऑगस्ट २०१९ मध्ये हा विशेषाधिकार रद्द करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला होता. मोदी सरकारने मुखर्जी यांच्या विचारांची अंमलबजावणी केली असल्याने भाजपसाठी ३७० हा केवळ आकडा नसल्याचा मुद्दा मोदींनी अधोरेखित केला.

आगामी लोकसभा निवडणुकीत विरोधकांकडून वेगवेगळे भावनिक मुद्दे उपस्थित केला जातील. पण, त्यांच्याकडे दुर्लक्ष करून गेल्या दहा वर्षांत मोदी सरकारने गरिबांच्या कल्याणासाठी **। पान २ वर**

## नरेंद्र मोदींना पंतप्रधान करण्यासाठी शिवसैनिकांनी कामाला लागावे!

### शिवसेनेच्या अधिवेशनात मुख्यमंत्र्यांचे आवाहन

कोल्हापूर : कोटयवधी हिंदूंचे राम मंदिराचे स्वप्न, काश्मीरमधील ३७० कलम हटवणे यांसारखे निर्णय शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी पाहिले असते, तर त्यांनी मोदींचे मुक्तकंठाने अभिनंदन केले असते. पण आज जे त्यांचा कौटुंबिक वारसा सांगत आहेत त्यांनी विचार बदलला आहे. यामुळे ते याबद्दल एक शब्दही उच्चारत नाहीत. बाळासाहेबांचा वारसा, हिंदूत्व हे सांगण्याचा नैतिक अधिकारच तुम्हाला नाही, अशी टीका मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर केली. तसेच देशाच्या आणि त्यासोबतच महाराष्ट्राच्या विकासासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना केंद्रात तिसऱ्यांदा सत्तेत आणण्यासाठी शिवसैनिकांनी कामाला लागण्याचे आवाहन केले.



कोल्हापूर येथे कालपासून शिवसेनेचे (शिंदे गट) दोन दिवसीय राज्यव्यापी अधिवेशन सुरू होते. आज या अधिवेशनाची सांगता झाली. आज दिवसभर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह पक्षाच्या विविध नेत्यांनी आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवर शिवसैनिकांना मार्गदर्शन केले. यामध्ये सर्वच नेत्यांनी आगामी लोकसभा निवडणुकीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या विजयासह देशात मोदींना पुन्हा पंतप्रधान करण्यासाठी शिवसैनिकांनी कामाला लागण्याचे आवाहन केले.

या अधिवेशनात काल मंजूर केलेल्या ठरावांमध्ये भाजपच्या गौरवाचे ठराव प्रामुख्याने होते. त्यापाठोपाठच आज अखेरच्या दिवशीही भाषणांमध्ये केंद्रात भाजपच्या गौरवाचाच प्रभाव दिसून आला.शिंदे म्हणाले, की आपण अधिवेशनात शेतकऱ्यांचे, गरजूंचे ठराव घेतले. बाळासाहेब ठाकरे आणि कोटयवधी हिंदूंचे राम मंदिराचे स्वप्न पंतप्रधान नरेंद्र मोदींनी पूर्ण केले आहे. आपण त्यांच्या अभिनंदनाचा प्रस्तावही सादर केला. देशाच्या आणि पर्यायाने महाराष्ट्राच्याही विकासासाठी नरेंद्र मोदी यांना पुन्हा केंद्रात सत्ता सोपवणे आवश्यक असल्याचे सांगत शिंदे म्हणाले, की लोकसभा निवडणुकीमध्ये ४०० हून अधिक जागा आणि महाराष्ट्रातून किमान ४५ जागा जिंकण्याचे उद्दिष्ट आपण ठेवलेले आहे. मोदींच्या नेतृत्वाखाली हे शक्य असून, त्यासाठी आपला पक्ष आणि प्रत्येक शिवसैनिकालाही आपले योगदान द्यावे लागणार आहे.

## अधिवेशनानंतर आंदोलनाची पुढील दिशा ठरवणार : जरांगे-पाटील

वडीगोद्री : राज्य विधिमंडळाचे अधिवेशन २० आणि २१ फेब्रुवारी रोजी होत आहे. यामध्ये सगेसोयऱ्यांबाबत कायदा पास करणे, गॅझेट स्वीकारणे, दाखल गुन्हे माघारी घेणे आदी महत्त्वाच्या विषयावर निर्णय होणार आहे. यामध्ये काय निर्णय होतो तसेच शासनाची काय भूमिका आहे हे कळेल. त्यानंतर मुंबईला जाण्याची व आंदोलनाची पुढील दिशा ठरवण्यात येईल, असे मनोज जरांगे-पाटील यांनी शनिवारी अंतरवाली सराटी येथे पत्रकार परिषदेमध्ये बोलताना सांगितले. त्यांचा शनिवारी उपोषणाचा आठवा दिवस आहे. राज्यात दहावी, बारावीच्या परीक्षा सुरू आहे या परीक्षेला विद्यार्थ्यांना जाता यावे यासाठी समाज बांधवांनी पुढे होऊन मदत करावी, त्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ देऊ नका, वाहने अडवू नका, शांततेत आंदोलन करा, वाटल्यास अधिवेशन होईपर्यंत आंदोलन थांबवा असे जरांगे यांनी सांगितले आहे.

मंत्री समिती यांनी लिहून घेतलेल्या व्याख्याप्रमाणे सगेसोयरे कायद्याची अंमलबजावणी करावी यामुळे ज्यांच्या नोंदी मिळाल्या नाही त्यांना कुणबी जात प्रमाणपत्र मिळेल तसेच गॅझेट, संस्थान, मंदिर, भाट, यामध्ये नोंदी सापडत आहेत त्यांनाही कुणबी जात प्रमाणपत्र मिळेल, शासन आरक्षण टक्केवारी ठरवत आहेत त्याची माहिती नाही परंतु त्या आरक्षण टक्केवारीमध्येसुध्दा ज्यांना प्रमाणपत्र पाहिजे त्यांनी ते घ्यावे त्यातही लाभ मिळेल. शासनाने शिंदे समितीला मुदतवाढ द्यावी, आमची मागणी ओबीसीमधूनच आरक्षण मिळावे अशी आहे ते टिकणारे आरक्षण आहे, मराठा आरक्षणाचा प्रश्न सुटत नाही तोपर्यंत शासन निवडणुका घेणार नाही, आजही जिल्हा परिषदेच्या किंवा इतर निवडणुका घेण्यात आलेल्या नाही, शेवटी मते मागण्यासाठी त्यांना आमच्याकडे यायचे आहे मला आशा आहे की, शासन आरक्षणाचा निर्णय होत नाही तोपर्यंत निवडणुका घेणार नाही.

## इस्त्राने लाँच केला 'नॉटी बॉय', नवा उपग्रह काय काम करणार?

नवी दिल्ली : भारतीय अंतराळ संशोधन संस्थेने (इस्रो) हवामानाची अचूक माहिती देणारा उपग्रह आज (१७ फेब्रुवारी) प्रक्षेपित (लाँच) केला आहे. आंध्र प्रदेशमधील श्रीहरीकोटा येथील सतीश धवन अंतराळ केंद्रातून इनसॅट ४ डीएस हा उपग्रह प्रक्षेपित करण्यात आला आहे. या वर्षातील इस्रोचं हे दुसरं यशस्वी लाँचिंग आहे. यापूर्वी १ जानेवारी २०१४ रोजी पीएसएलव्ही-सी५८/एक्स्पोसॅट मोहिमेचं यशस्वी लॉन्चिंग करण्यात आलं होतं. या मालिकेतला शेवटचा उपग्रह इनसॅट ३ डीआर हा ८ सप्टेंबर २०१६ रोजी प्रक्षेपित करण्यात आला होता.



इनसॅट-३डीएस कार्यान्वित झाल्यानंतर हा उपग्रह पृथ्वी विज्ञान मंत्रालयाच्या अंतर्गत येणाऱ्या सर्व विभागांना माहिती आणि सेवा प्रदान करेल. हा उपग्रह भारतीय हवामान विभाग (IMD), नॅशनल इन्स्टिट्युट ऑफ ओशियन टेक्नोलॉजी (NIOT) नॅशनल सेंटर ऑफ मीडियम रेंज वेदर फोरकॉस्टिंग आणि भारतीय राष्ट्रीय महासागर माहिती विभागाला लागणारी हवामानाबाबतची वेगवेगळ्या प्रकारची माहिती प्रदान करेल. हा उपग्रह अवकाशात नेणाऱ्या रॉकेटची लांबी केवळ ५१.७ मीटर इतकी आहे.

या मोहिमेची माहिती देताना इस्रोचे अध्यक्ष एस. सोमनाथ म्हणाले, १० नोव्हेंबर २०२३ पासून आम्ही इनसॅट-३डीएस च्या चाचण्या करण्यास सुरुवात केली होती. हा उपग्रह ६-चॅनेल इमेजर आणि १९-चॅनेल साऊंडद्वारे हवामानाशी संबंधित माहिती आपल्याला प्रदान करेल. संशोधनासाठी या उपग्रहाचा उपयोग होणार आहे. तसेच आपत्तीकाळात बचावासाठी लागणारी माहितीदेखील याद्वारे आपल्याला मिळेल. या मोहिमेच्या उद्दिष्टांविषयी सोमनाथ म्हणाले, इनसॅट ३डी आणि इनसॅट ३डीआर हवामानाशी संबंधित नवी माहिती जलदगतीने आपल्यापर्यंत पोहोचवेल.

हा उपग्रह हवामानाचा अंदाज, जमीन आणि समुद्राच्या पृष्ठभागावर बारीक लक्ष ठेवेल. तसेच आपत्तीची पूर्वसूचना देईल. या उपग्रहाद्वारे आपत्तीकाळत बचावासाठी लागणारी माहितीदेखील आपल्याला मिळत राहील.

## गुलजार, स्वामी रामभद्राचार्य यांना ज्ञानपीठ पुरस्कार

नवी दिल्ली : २०२३ चा ५८ वा ज्ञानपीठ पुरस्कार प्रसिद्ध गीतकार गुलजार यांना उर्दूसाठी, तर संस्कृत विद्वान जगद्गुरू स्वामी रामभद्राचार्य यांना संस्कृतसाठी जाहीर झाला आहे. अशी माहिती निवड समितीने दिली आहे. ज्ञानपीठ समितीने एका निवेदनात म्हटले आहे की, २०२३ चा ५८ वा ज्ञानपीठ पुरस्कार दोन भाषांमधील प्रख्यात लेखकांना देण्यात येत आहे. यामध्ये संस्कृत साहित्यिक जगद्गुरू स्वामी रामभद्राचार्य आणि प्रसिद्ध उर्दू साहित्यिक, कवी गुलजार यांना देण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याचे देखील समितीने स्पष्ट केले आहे. यापूर्वी २०२२ चा ५७ वा ज्ञानपीठ पुरस्कार हा गोव्यातील लेखक दामोदर मावजो यांना जाहीर झाला होता.

गुलजार यांनी अनेक चित्रपटांमध्ये गाणी लिहिण्यासोबतच गझल आणि कविता क्षेत्रात नावलौकिक मिळवला आहे. गुलजार हे हिंदी चित्रपटसृष्टीतील कामांसाठी ओळखले जातात. त्यांना २०१३ मध्ये दादासाहेब फाळके पुरस्कार, २००४ मध्ये पद्मभूषण पुरस्कार मिळाले आहेत. जन्मजात अंध असलेले आणि १०० पुस्तकांचे लेखक जगद्गुरू स्वामी





रामभद्राचार्य हे संस्कृत भाषा, वेद आणि पुराणांचे महान अभ्यासक आहेत. मध्य प्रदेशातील चित्रकूटमधील तुलसीपीठाचे ते संस्थापक आहेत.

## जि.प. उप अभियंता यांचे मान्यता नसतांना रोहयो रस्त्याच्या कामास प्रारंभ झालास कसा ?

### अक्कलकोट पंचायत समितीतील रोहयो विभागातील सावळा गोंधळ

अक्कलकोट/प्रतिनिधीः जिल्हा परिषद बांधकाम विभागाकडून काम चालू करण्याचे आदेश नसतांना दर्शनाळ रस्त्याच्या कामास सुरवात झालास कसा, असं प्रश्र्न ग्रामस्थांना पडले आहे याबाबत ग्रामपंचायत सदस्य आकाश माने यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद सोलापूर व जिल्हाधिकारी सोलापूर यांच्या कडे लेखी तक्रार करून कार्यवाही मागणी केले



गटविकास अधिकारी व संबंधित विभागाला माहिती न देता मजुरांचे अकुशल् रक्कम मजुराच्या खात्यात जमा केलीच कशी, मस्टर आदेश निघालाच कसा? असा प्रश्र्न उपस्थित होत आहे.कर्मचाऱ्यांनी मनमानी कारभार करत मग्रारोहयोची नियमावली धाब्यावर बसवून रस्त्याची कामे सुरू केल्याचा उघडकीस आले आहे.

रोजगार हमी योजनेतुन अक्कलकोट तालुक्यातील दर्शनाळच्या अंतर्गत रस्त्यासाठी पंचायत समिती व जि.प.(बांखा )उपविभाग अक्कलकोट यांच्याकडून प्रशासकीय मान्यता व तांत्रिक मंजुरी आहे की नाही याबाबत अधिकारी मध्ये मत वेग वेगळे आहे, रस्त्याचे काम चालू करण्यासाठी संबंधित विभागाचे उप अभियंता किंवा सहायक अभियंता यांनी त्या गावात जाऊन कामाची पाहणी केले नाहीत व काम सुरू करण्याचे आदेश देण्यात आले नाही परंतु आ खुशल एम बी तयार करून सही साठी तयार आहे असे असतांना प्रशासकीय विभागाच्या अधिकाऱ्यांना पूर्व कल्पना न देता.काही लोकांनी थातूरमातूर पद्धतीने रस्त्याचे काम पुर्ण केली.

इस्टिमेट प्रमाणे रस्त्याचे काम न करता.दहा एमएम क्रेशर वापरून अतिशय कमी प्रमाणात सिमेंटचा वापर करण्यात आले आहे.त्यामुळे ठिकठिकाणी या रस्त्याला तडे गेल्याने या रस्त्याच्या कामाची गुणवत्ता व दर्जाविषयी शंका उपस्थित होत असून त्याची चौकशी मागणी होत आहे

दर्शनाळ येथील रस्त्याचे काम रोजगार हमी योजनेतून

**योजना कितीही चांगल्या आखल्या तरी त्याची अंमलबजावणीच्या पातळीवर मातीच करायची हा जणू प्रशासकीय लोकांनी घेतलेला वसाच! त्याची प्रचिती अन्य योजने प्रमाणे रोजगार हमी योजनेत देखील दिसून येत हे नक्कीच.**

करण्यात आले.परंतु जसे कामे होतील तशी हजेरी मस्टर भरले जाते.परंतु संपूर्ण काम संपले, मस्टर मात्र दोनच निघाले. त्या मस्टरचे बिल गट विकास अधिकारी व संबंधित विभाग यांना पुर्व कल्पना न देता रोहयो विभागातील एका कर्मचाऱ्याने मनमानी करत मजुरांची रक्कम बॅक खातेमध्ये पाठवले आहे. त्यामुळे आश्र्चर्यव्यक्त केले जात आहे.

भ्रष्ट अधिकारी आणि कर्मचारी यांना अर्थपूर्ण देवाण घेवाण केल्याचे चर्चा आहे,याकडे जिल्हाधिकारी यांनी लक्ष देवून अक्कलकोट पंचायत समिती मधील कर्मचारी यांनी केलेल्या कामाची चौकशी करावी अशी मागणी होत आहे.

रोजगार हमी योजनेअंतर्गत विविध कामे करण्यात येत असून रमाई घरकुल व प्रधानमंत्री घरकुल मस्टर काढण्यासाठी पाचशे ते हजार रुपये घेण्यात येत असून पैसे न दिल्यास मस्टर काढण्यासाठी टाळा टाळ करण्यात येतो, अहिल्याबाई होळकर सिंचन विहिरीसाठी वीस ते पंचवीस हजार रुपये रोजगार सेवक यांच्या माध्यमातून मागणी करत असून त्यामुळे

**सदर कामात वेंडर नेमणूक करण्यात आले नसून ग्रामपंचायत मासिक सभेत सदर विषयाबाबत चर्चा व ठराव घेण्यात आलेले नाही सदर मीटिंग ठरावात नंतर खडा खोड केल्याचे स्पष्ट दिसत आहे व वेंडर नेमणूक न करता मस्टर कसे काढण्यात आले ज्यांनी मस्टर काढून कार्यालयाचे दिशाभूल केले आहे त्याच्यावर त्वरित निलंबनाचे कार्यवाही करण्यात यावी दोशीवर रीतसर फौजदारी कारवाई करण्यात यावी.अन्यथा पंचायत समिती समोर उपोषणला बसणार आहे.**

**-आकाश माने, ग्रामपंचायत सदस्य,दर्शनाळ**

शेतकऱ्यांना विहीर लाभ घेणे अवघड होत आहे

महाराष्ट्र रोजगार हमी योजनेअंतर्गत मातोश्री पाणद रस्ता अंदाजपत्रक तयार करण्याचे काम नेमक कुणाचं आहे याबाबत रोजगार हमी कार्यालयात एकमेकावर ढकलत आहे, सदर कार्यालयात काही एजेंट काम करत असून त्यांचे नेमणूक कुणी केले

व त्यांना जबाबदारी कोणते कुणाच्या आदेशाने दिले यांची चौकशी करण्याचे मागणी होत असून दर्शनाळ येथील मस्टर पगार हे गट विकास अधिकारी यांच्या डी आय सी द्वारे कसे व कुणी सोडले त्याच्यावर प्रशासनाने त्वरित कार्यवाही करण्यात यावे

# संपादकीय

## अपक्ष निवडून आणता ..

अलीकडे निवडणुकीचे निकाल जाहीर झाले आणि अभूतपूर्व परिस्थिती निर्माण झाली आहे. पाकिस्तानात यंदा सर्वाधिक संख्येने माजी पंतप्रधान इम्रान खान यांच्या पाकिस्तान तेहरिक-ए-इन्साफ या पक्षाने समर्थन दिलेले अनेक अपक्ष उमेदवार निवडून आले आहेत. इम्रान यांना निवडणुकीच्या राजकारणापासून दूर ठेवण्यासाठी नवाझ शरीफ यांचा पाकिस्तान मुस्लीम लीग आणि पाकिस्तान पीपल्स पार्टी या दोन पक्षांनी जंग जंग पछाडले. पण पाकिस्तानातील युवा मतदारांनी इम्रान यांच्या पक्षाला पसंती दिली आहे. पाकिस्तान हा खूप लहान देश असला तरीही तेथे सारी सत्ता लष्कराची असते. त्यामुळे लष्कराला वाटेल तोच पंतप्रधान होतो. त्याला लष्कराच्या तालावर नाचावे लागते. इम्रान खानही त्याला अपवाद नव्हते. पण नवाझ शरीफ किंवा बिलावल भुत्तो या गणगांपेक्षा इम्रान खान तेथे आजही लोकप्रिय आहेत, याचेही प्रत्यंतर निवडणूक निकालांनी दाखवून दिले आहे. इम्रान यांचा पक्ष म्हणजे पीटीआयने समर्थन दिलेल्या अपक्ष उमेदवारांमुळे पाकिस्तानातील पक्षीय राजकारणातील पारंपरिक गतिशीलतेला आव्हान दिले गेले आहे. तीव्र अशा स्वरूपाच्या राजकीय तिकडमबाजीला या निकालांनी तेज केले आहे. परिणामी पीपीपी आणि शरीफ यांचा पीएमएलएन या पक्षांनी आता औपचारिकपणे एकत्र येण्यासाठी बोलणी सुरू केली आहेत. त्यांच्यात पहिली औपचारिक बैठकही झाली. कोणत्याही परिस्थितीत इम्रान यांना आपल्याला आव्हान देण्याच्या स्थितीत राहू द्यायचे नाही, असा प्रयत्न या पक्षांनी केला आहे. त्यांची पोटदुखी ही आहे की इम्रान हे फार कर्तृत्ववान नसले तरीही युवा पिढीसाठी तेच सर्वाधिक लोकप्रिय नेते आहेत. त्यांना हरतऱ्हेने त्रास देण्याचा प्रयत्न या दोन्ही पक्षांनी केला. पण त्याला जनतेने धूप घातला नाही. पाकिस्तानातील निकालांनी राजकीय परिस्थितीत भूकंपीय बदलाचे संकेत दिले आहेत. हाच नाट्यपूर्ण आणि अचानक बदल झालेल्या संज्ञेचा अर्थ आहे. देशाच्या इतिहासात प्रथमच इतक्या मोठ्या संख्येने अपक्ष निवडून आले आहेत. इम्रान यांच्या पक्षाला तर निवडणूक लढवण्याची परवानगी देण्यात आलेली नव्हती. त्यामुळे त्यांनी अपक्ष उभे केले होते. पाकिस्तानातील राजकीय ---आकांना वाटले की, इम्रान यांच्या पक्षाचे चिन्ह गोठवले आणि त्यांच्याकडे दुर्लक्ष केले तर निवडणुकीचे निकाल बदलू शकतील. पण पाकिस्तानातील मतदारांनी शरीफ किंवा भुत्तो यांच्या संस्थानिक मानसिकतेत असलेल्या पक्षांना नाकारले आणि इम्रान यांना सर्वाधिक संख्येने आपले अपक्ष निवडून आणता आले.

# राज्याचे विशेष अधिवेशन

## हरकती सुचना आणि सर्वोच्च न्यायालयाचे निरीक्षण या स्वतंत्र बाबी : जेष्ठ अभ्यासक राजेंद्र दाते पाटील

सध्य स्थितीत मराठा समाजाचे मराठवाड्यातील कुणबी आरक्षण नोंदी नुसार देण्यासाठी असलेली मागणी राज्याचे विशेष अधिवेशनात मराठा हरकती सुचना आणि सर्वोच्च न्यायालयाचे निरीक्षण या स्वतंत्र बाबी असुन आरक्षण कायदा म्हणजे सर्वोच्च न्यायालयाच्या निरीक्षणा ची अंमलबजावणी करावी लागेल असे अत्यंत स्पष्ट आणि घटनात्मक तरतुदींचे विवेचन सर्वोच्च न्यायालयातील मुख्य हस्तक्षेप याचीका कर्ते तथा जेष्ठ अभ्यासक राजेंद्र दाते पाटील यांनी केले आहे.

पुढे बोलतांना ते म्हणाले की,सध्या त्या आंदोलना विरुध्द काउंटर ओबीसी आंदोलन सुरु आहे.याला राजकीय वळण लागले असुन प्रत्येकाला जातीतून पाहायचं सवय राजकीय पक्षांच्या नेत्यांना लागली असल्यामूळे मराठा आरक्षण या शब्दालाच विरोध करणे याच अधिवेशनात निष्प्रभ ठरणार असल्याचे स्पष्ट प्रतिपादन जेष्ठ अभ्यासक राजेंद्र दाते पाटील यांनी केले आहे. आंदोलनाला सकारात्मक पद्धतीनं पाहताना पुढच्या आठवड्यातील विशेष अधिवेशनात कायदेशीर आणि घटनात्मक निर्देशांनुसार महाराष्ट्र राज्याला असेलल्या अधिकारात राज्य शासनाला निर्णय घ्यावा लागेल आणि तो ही फक्त सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या मराठा आरक्षणाच्या याचीके मधील निर्णय आणि निरीक्षण नोंदी प्रमाणे अंमलबजावणी करावी लागेल ज्यात इंद्रा सहानी प्रकरणाची ५०% ची कॅप परत आडवी येणार आसल्याचे स्पष्ट प्रतिपादन सर्वोच्च न्यायालयातील मुख्य हस्तक्षेप याचीका कर्ते अभ्यासक राजेंद्र दाते पाटील यांनी केले असुन ही बाब त्यांनी केंव्हाच राज्य शासनाच्या निदर्शनास आणुन दिले आहे.

न्यायमुर्ती सुनिल सुक्रे आयोगाला सुद्धा भारतीय राज्य घटनेतील ३४०व्या परिच्छेदा मध्ये नमुद मार्गदर्शक तत्वा नुसारच कामकाज करावे लागले आणि त्यात मराठा समाज सामाजीक आणि शैक्षणीक दृष्ट्या मागास आहे किंवा नाही हे आपल्या अहवालात नमुद करावे लागेल आणि हीच बाब नेमकी राज्य शासनाच्या टर्म्स ऑफ रेफरन्सेस नुसार असल्यामूळे या व्यतिरिक्त कुठलाही निर्णय राज्य शासनास घेता येणार नसल्याचे अत्यंत स्पष्ट प्रतिपादन सर्वोच्च न्यायालयातील मुख्य हस्तक्षेप याचीका कर्ते अभ्यासक राजेंद्र दाते पाटील यांनी केले आहे.

पुढे बोलतांना अत्यंत महत्वाची माहिती त्यांनी देताना नमुद केले की, सध्य स्थितीत मराठा समाजाचे मराठवाड्यातील कुणबी आरक्षण हे नोंदी नुसार देण्यासाठी आंदोलन सुरु असुन त्या आंदोलना विरुध्द काउंटर ओबीसी आंदोलन सुरु आहे.याला राजकीय वळण लागले असुन प्रत्येकाला जातीतून पाहायचं सवय राजकीय पक्षांच्या नेत्यांना लागली असल्यामूळे मराठा आरक्षण या शब्दालाच विरोध करणे याच अधिवेशनात निष्प्रभ ठरणार असल्याचे स्पष्ट प्रतिपादन जेष्ठ अभ्यासक राजेंद्र दाते पाटील यांनी केले आहे. आंदोलनाला सकारात्मक पद्धतीनं पाहताना पुढच्या आठवड्यातील विशेष अधिवेशनात कायदेशीर आणि घटनात्मक निर्देशांनुसार महाराष्ट्र राज्याला असेलल्या अधिकारात राज्य शासनाला निर्णय घ्यावा लागेल आणि तो ही फक्त सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या मराठा आरक्षणाच्या याचीके मधील निर्णय आणि निरीक्षण नोंदी प्रमाणे अंमलबजावणी करावी लागेल ज्यात इंद्रा सहानी प्रकरणाची ५०% ची कॅप परत आडवी येणार आसल्याचे स्पष्ट प्रतिपादन सर्वोच्च न्यायालया तील मुख्य हस्तक्षेप याचीका कर्ते अभ्यासक राजेंद्र दाते पाटील यांनी केले असुन ही बाब त्यांनी केंव्हाच राज्य शासनाच्या निदर्शनास आणुन दिले आहे.



म्हणून आता गरज आहे ती --

भाजपा- शिवसेना शिंदे गट- राष्ट्रवादी अजित पवार गट सोबतच काँगेस-शिवसेना उबाठा गट- राष्ट्रवादी शरद पवार गट या सह सर्वच राजकीय पक्षांनी मिळून राजकीय भुमिका न घेता कायम स्वरुपी टिकणारे आरक्षण देण्यासाठी आणि घटनात्मक तरतुदी नुसार भुमिका पार पाडण्याची.

सर्वोच्च न्यायालयाच्या घटना पीठाने ई.डब्लू.एस.१०% आर्थिक कमकुवत घटकास दिलेले आरक्षण आहे ते म्हणजे आरक्षण म्हणजे आरक्षणाची मर्यादा वाढली असे बिलकुल म्हणता येणार नाही.

आयोगाची शिफारस प्राप्त करून घेतल्यावर आणि त्यास रितसर विधान सभा आणि विधान परिषदेत मंजुरी घेतल्यावरच आरक्षण कायदा करून आरक्षण देता येईल,

परंतु त्यात सुध्दा कायदेशीर व घटनात्मक पेच पुढे आडवा येणार आहे.मुळात घटना दुरूस्ती हा विचार महाराष्ट्र राज्य शासन करीत असेल तर घटना दुरुस्ती करण्याचा स्पष्टअधिकार भारतीय राज्य घटनेतील परिच्छेद ३६८ नुसार फक्त लोकसभेस म्हणजे केंद्र शासनास आहे म्हणुन आता राज्य शासनास घटना दुरुस्ती किंवा आरक्षण मर्यादेत वाढ करणे याचा काही एक अधिकार नसताना हा आट्टाहास राज्य शासन का करीत आहे असा प्रचंड मोठा व घटनात्मक प्रश्न्न राज्य शासना समोर जेष्ठ अभ्यासक राजेंद्र दाते पाटील यांनी उपस्थित केला आहे.

आता अधिवेशनाचे कामकाज लक्षात घ्या

राज्य सरकारला त्यांनी तयार केलेल्या कोणत्याही कायद्याची अंमलबजावणी करावयाची असल्यास त्याचे नियम तयार लागतात आणि सदरच्या प्रस्तावित नियमा मध्ये काही बदल करावयाचे किंवा काही सुधारणा करायची असे जर का शासनास वाटत असेल तर अशा स्थितीत राज्य शासनाला या अनुषंगाने नागरिकांच्या हरकती व सूचना प्राप्त करणे साठी अधि सुचनेचा मसुदा प्रसिद्ध करावा लागतो करण्यात आणि त्यात जर काही हरकती व सूचना शासनास प्राप्त झाल्यास राज्य शासन त्यावर यथा योग्य कायदेशीर अंगाने विचारविनिमय करून आवश्यक असेल तर बदल करून किंवा दुरुस्ती करून शासनाच्या आणि मंत्री मंडळाच्या मान्यतेस्तव अंतिम करून राजपत्रात प्रसिद्ध करण्याचे अपेक्षीत आहे.

आता महाराष्ट्र शासन जात प्रमाणपत्र २००० या अधिनियमा तील नियम २०१२ मध्ये सुधारणा करण्यासाठी राज्य शासनाने २७ डिसेंबर २०२३ आणि २६ जानेवारी २०२४ या दिवशी अधिसूचना प्रसिद्ध करून हरकती व सूचना या पूर्वीच मागविलेल्या असुन त्या साठी १६ फेब्रुवारी २०२४ ही अंतिम मुदत देण्यात आलेली होती. त्या नंतर मंत्री मंडळ त्यास अंतिम मान्यता देते. अशा अंतिम केलेली अधिसुचना विधिमंडळा च्या येणाऱ्या अधिवेशनात विधिमंडळाच्या पटलावर फक्त माहितीसाठी ठेवली जाते, असे सगळे काही स्पष्ट असताना सुद्धा काहीच कळत नाही असा आव आणून दिशाभूल केल्या जात आहे. आता नियम,कायदा तरतुद पाहीली तर जर का मूळ कायद्या मध्ये अत्यंत तातडीने काही बदल करायचा असेल तर त्या साठी विधिमंडळाचे काळ नसतो त्याच वेळेत किंवा अधिवेशन नसते अशाच काळात राज्य शासन अध्यादेश काढला जातो आणि त्यास म्हणजे अशा अध्यादेशास नजीकच्या येणाऱ्या विधिमंडळाच्या तथा अधिवेशनात त्याला मान्यता देण्याची प्रथा असताना जर का अधिवेशन काळात मूळ कायद्या मध्ये बदल करावयाचे झाल्यास आणि अशा मुळ कायद्यात केलेला बदल अथवा दुरुस्तीची सुधारणा विधिमंडळाच्या मान्यते साठी सादर केली जाण्याची कामकाजाची प्रथा असल्याचे स्पष्ट प्रतिपादन सर्वोच्च न्यायालयातील मुख्य हस्तक्षेप याचिकाकर्ते आणि जेष्ठ अभ्यासक राजेंद्र दाते पाटील यांनी केले आहे.

आता काय स्थिती आहे ?

सामाजीक न्याय व विशेष सहाय्य विभागाची नियमांची मसुदा असलेली २६जानेवारी २०२४ची अधिसूचना सर्व काही स्पष्ट करीत

असुन जात प्रमाणपत्राच्या अनुषंगाने प्रस्तावीत केलेला बदल तथा सुधारणा ही नियमात केलेला आहे त्यामुळे मूळ कायद्यात सुधारणा प्रस्तावित केलेली नसल्याने कायद्या मध्ये कोणताही बदल होणार नाही हे सगळ्यांनी समजुन घेणे अत्यावश्यक आहे.

पान १ वरुन

## लोकसभेसाठी ३७० जागांचे..

केलेल्या कार्याचा प्रचार-प्रसार करण्याचे आवाहन मोदींनी पदाधिकाऱ्यांनी केले. दहा वर्षांमध्ये गरिबांसाठी विविध योजना राबवल्या. उचित आर्थिक धोरण लागू करून देशाला पुन्हा विकासाच्या मार्गावर नेले. जागतिक स्तरावर देशाला सन्मान वाढवला. याच तीन मुद्दयांभोवती लोकसभा निवडणुकीचा प्रचार केंद्रीत असेल, असेही मोदींनी स्पष्ट केले.

या निवडणुकीत 'विकसीत भारत, मोदींची गॅरंटी आणि तिसऱ्यांदा मोदी सरकार' हा भाजपचा नारा असेल! भाजपप्रणित 'एनडीए'ला 'चारसो पार' जागा मिळवून देण्यासाठी प्रत्येक बूथ कार्यकर्त्यांने मतदान केंद्रांवर लक्ष केंद्रित केले पाहिजे, असेही मोदींनी पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत सांगितले. केंद्र सरकारच्या विविध योजना लाभार्थीपर्यंत पोहोचण्यासाठी भाजपच्या वतीने २५ फेब्रुवारीपासून जनसंपर्क मोहीम सुरू केली जाणार असल्याची माहिती राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे यांनी पत्रकारांना दिली.

गेल्या वेळी पराभव झालेल्या देशातील १६१ लोकसभा मतदारसंघांपैकी अधिकाधिक जागा जिंकण्याचे भाजपचे ध्येय आहे. त्यासाठी दीड वर्षांपासून तयारी केली गेली होती. प्रत्येक मतदारसंघामध्ये जबाबदारी देण्यात आलेल्या केंद्रीय मंत्र्याने किमान तीन वेळा भेटी दिलेल्या आहेत. तिथले महिला बचत गट, स्वयंसेवी संस्था यांचीही मदत घेण्यात आली आहे, अशी माहिती विनोद तावडे यांनी दिली.

# म्हसळा नगर पंचायत हद्दीत पिण्याचे मुबलक, स्वच्छ पाणी मिळेल : उपमुख्यमंत्री अजित पवार

रायगड : म्हसळा शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या प्रकल्पाचे भूमिपूजन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते झाले. यामुळे म्हसळा नगर पंचायत हद्दीतील मोठ्या लोकवस्तीतील नागरिकांना पिण्याचे मुबलक आणि स्वच्छ पाणी मिळेल असा विश्र्वास उपमुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला. महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत म्हसळा शहरासाठी ४३ कोटी रुपयांच्या निधीची प्रशासकीय मान्यता मिळाली आहे.

म्हसळा येथील कार्यक्रमासाठी महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, खासदार सुनील तटकरे, आमदार अनिकेत तटकरे, जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, नगराध्यक्ष संजय कर्णिक, उपनगराध्यक्ष संजय दिवेकर, मुख्याधिकारी विठ्ठल राठोड उपस्थित होते.उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, या प्रकल्पामुळे म्हसळा नगर पंचायत हद्दीतील नागरिकांना मुबलक व स्वच्छ पाणी पुरवठा होणार आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या स्वराज्याची राजधानी असलेल्या रायगड जिल्ह्याला युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांची प्रेरणा आणि शाहु, फुले, आंबेडकर यांच्या विचारांचा वारसा लाभला आहे. म्हसळा तालुक्यातील विकास कामांसाठी आवश्यक निधी उपलब्ध करुन दिला जाईल, अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली.

शासनाच्या योजनांचा जनतेला जास्तीत जास्त फायदा कसा होईल, राज्य शासनामार्फत यावर विशेष भर दिला जात आहे. यासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनाची माहिती दिली. शेतकऱ्यांना पीक विमा, आर्थिक सहाय्य, शेतीसाठी ० टक्के व्याजाने कर्ज पुरवठा, वीज, पाणी, रस्ते विकासासाठी शासनाकडून महत्वपूर्ण निर्णय घेतले जात आहेत. तसेच राज्यातील महिला आणि



मुलींचा मान सन्मान वाढविणे, ८ लक्ष रुपये पेक्षा कमी उत्पन्न असलेल्या कुटुंबातील मुलींना मोफत उच्च व तंत्र शिक्षण घेता यावे, यासाठी शासनाने महत्त्वपूर्ण असा निर्णय घेतला आहे, असेही श्री.पवार यांनी सांगितले.खासदार सुनिल तटकरे म्हणाले की, म्हसळा तालुक्यातील मोठमोठ्या विकास कामांसाठी निधीची उपलब्धता करून दिल्यामुळे पर्यटन विकासाला चालना मिळाली असून पर्यटकांची संख्या चार ते पाच पटीने वाढली आहे. येत्या वर्षभरात या प्रकल्पाच्या कामाचे उद्घाटन होईल, असा विश्र्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

मंत्री कु.आदिती तटकरे यांनी म्हसळा शहराला पाणीपुरवठा योजनेसाठी ४३ कोटी रुपये मंजूर झाल्याबद्दल आभार मानले तसेच म्हसळा तालुक्यात नगर पंचायत कार्यालय आणि तहसिलदार प्रशासकीय इमारत बांधकामासाठी आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्याची मागणी केली.

# सौ सुरेखा कल्याणशेट्टी विद्यालयात किशोरवयीन मुलीना मार्गदर्शन



अक्कलकोट/प्रतिनिधी : महर्षि विवेकानंद समाजकल्याण संस्थेचे सौ सुरेखा कल्याणशेट्टी माध्यमिक व उच्च माध्यमिक मराठी व सेमी इंग्रजी विद्यालयात इ. ५ वी ते १२ वी पर्यंत च्या विद्यार्थ्यांना आरोग्य व शारीरिक स्वच्छता या विषयी माहिती व्हावी म्हणून अक्कलकोट येथील नामवंत महिला डॉक्टर सौ भाग्यश्री मद्री- बनसोडे यांचे मार्गदर्शन शिबीर आयोजित करण्यात आले होते. यावेळी संचालिका सौ शांभवी कल्याणशेट्टी, सीइओ सौ रूपाली शहा,ज्युनियर कॉलेज विभाग प्रमुख सौ पूनम कोकळगी हे उपस्थित होते. वयात येणा-या मुलीना आरोग्य व शारीरिक स्वच्छता या बाबत शालेय स्तरावर समुपदेशन करण्याची गरज असल्याचे मत डॉ. सौ. बनसोडे यानी व्यक्त करून शिबीरातील सर्व मुलीना अतिशय मोलाचे मार्गदर्शन केले. यावेळी मनिषा शिंदे, कल्पना स्वामी, निशिगंधा कोळी,विद्या बिराजदार, सलोनी शहा आदी महिला शिक्षका व बहुसंख्य विद्यार्थीनी उपस्थित होते..

# विद्यापीठाने वंचित महिलांपर्यंत उच्च शिक्षणाच्या संधी पोहोचवाव्यात : राज्यपाल

मुंबई : स्वातंत्र्यप्राप्तीच्या वेळी देशात असलेला महिला साक्षरतेचा दर ९ टक्क्यांवरून आज ७७ टक्क्यांवर आला असला तरी देखील उच्च शिक्षण प्रवाहात महिलांचे, आणि विशेषतः आदिवासी क्षेत्रातील महिलांचे प्रमाण बरेच कमी आहे. हे प्रमाण वाढविण्याच्या दृष्टीने एसएनडीटी महिला विद्यापीठाने आदिवासी, सामाजिक - आर्थिकदृष्ट्या मागास, ड्रॉप आऊटस, अल्पसंख्यांक, दिव्यांग महिला तसेच तुरुंगांमध्ये शिक्षा भोगत असलेल्या महिलांपर्यंत पोहोचावे, असे आवाहन राज्यपाल तथा विद्यापीठाचे कुलपती रमेश बैस यांनी आज येथे केले.

राज्यपाल श्री. बैस यांच्या प्रमुख उपस्थितीत शनिवारी (दि. १७) श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठाचा ७३ वा वार्षिक दीक्षान्त समारंभ विद्यापीठाच्या पाटकर सभागृहात पार पडला, त्यावेळी ते बोलत होते.यावेळी विद्यापीठाच्या कुलगुरु प्रा. उज्वला चक्रदेव, प्र-कुलगुरू प्रा. रुबी ओझा, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ डॉ. संजय नेरकर, विविध विभागांचे अधिष्ठाता, प्राध्यापक व स्नातक विद्यार्थी उपस्थित होते.

आश्रमशाळांमधील अनेक आदिवासी मुली दहावीनंतर शिक्षणाच्या प्रवाहातून बाहेर पडतात, असे नुकत्याच घेतलेल्या एका शासकीय आढावा बैठकीत समजल्याचे नमूद करुन विद्यापीठाने आदिवासी मुलींच्या शिक्षण सोडण्याची कारणे शोधून त्यांना उच्च शिक्षण प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न करावेत, असे राज्यपालांनी सांगितले. आगामी काळात अधिकाधिक महिलांपर्यंत उच्च शिक्षण नेण्याच्या दृष्टीने विद्यापीठाने व्यावसायिक स्तरावर मार्गदर्शन घ्यावे, अशी सूचना करताना विद्यापीठाने तंत्रज्ञान तसेच ऑनलाईन शिक्षणाचा वापर वाढवून महिलांचे उच्च शिक्षणातील प्रमाण वाढवावे, असे राज्यपालांनी सांगितले.

आजच्या युगात केवळ पारंपरिक शिक्षण हे रोजगार प्राप्ती किंवा उद्यमशीलतेसाठी पुरेसे नाही असे नमूद करून महिला विद्यापीठाने राज्य कौशल्य विद्यापीठासोबत सहकार्य करावे, असे त्यांनी सांगितले.

कृत्रिम प्रज्ञा तंत्रज्ञानाचे फायदे आणि तोटे याबाबत देखील विद्यापीठाने विद्यार्थ्यांचे प्रबोधन करावे, असे राज्यपाल श्री. बैस यांनी सांगितले.

महिलांचे प्रमाण प्रत्येक क्षेत्रात वाढत आहे.

स्थानिक स्वराज्य संस्था आणि संसद व विधानमंडळांमध्ये देखील महिलांचे प्रमाण वाढत आहे. या पार्श्र्वभूमीवर महिलांनी सार्वजनिक हिताचे विषय, शासन व प्रशासन यामध्ये सहभाग वाढवावा, असे आवाहन त्यांनी केले.यावेळी सादर केलेल्या विद्यापीठ अहवालामध्ये कुलगुरु उज्वला चक्रदेव यांनी विद्यापीठाच्या कार्याचा विस्तार, विद्यापीठाने सुरु केलेले स्पर्धात्मक परीक्षा केंद्र, आंतरराष्ट्रीय स्तरावर विद्यापीठाने केलेले सहकार्य, सुरु केलेले नवे कौशल्याधारित अभ्यासक्रम इत्यादी बाबींची माहिती दिली.

दीक्षान्त समारंभामध्ये विज्ञान व तंत्रज्ञान, वाणिज्य व व्यवस्थापन, मानव्य विद्या शाखा तसेच आंतरविद्याशाखीय अभ्यासक्रमांमधील १३ हजार ७४९ विद्यार्थिनींना पदवी आणि पदविका प्रदान करण्यात आल्या.

४३ विद्यार्थिनींना विद्यावाचस्पती पदवी देण्यात आली तर ७१ विद्यार्थिनींना सुवर्ण पदक, एका विद्यार्थिनीला रजत पदक आणि १३३ विद्यार्थिनींना रोख पारितोषिके देऊन सन्मानित करण्यात आले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# शिक्षणाबरोबर विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रेरणा मिळावी यासाठी सांस्कृतिक कार्यक्रमाची जोड असावी : मधुकरराव चव्हाण



नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे : नळदुर्ग या ऐतिहासिक नगरी मध्ये बालाघाट डोंगराच्या कुशीत बसलेल नळदुर्ग शहर या शहरात शिक्षण समूहाच्या वाटचालीत अनेक विद्यार्थी घडविण्याचे प्रामाणिक काम होत आहे कारण शिक्षणा बरोबर सांस्कृतिक कार्याची ओळख करून देणे खुप महत्वाचे आहे सांस्कृतिक कार्यक्रमाने विद्यार्थांना प्रेरणा सुद्धा मिळते असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री मधुकरराव चव्हाण यांनी स्नेहसंमेलनाच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते .

नळदुर्ग येथील कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्सहात संपन्न झाले .या स्नेहसंमेलनाचे उद्घाटण बालाघाट शिक्षण संस्थेचे अध्यक्ष माजी मंत्री मधुकरराव चव्हाण यांच्या शुभ हस्ते करण्यात आले प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे सचिव उल्हासदादा बोरगांवकर कार्याध्यक्ष रामदादा आलुरे , उपाध्यक्ष डॉ. अभय शहापूरकर कोषाध्यक्ष प्रदीप मंटगे सहसचिव प्रकाशराव चौगुले , सहसचिव शहबाज काझी . लिंबराज कोरेकर , उपस्थित होते . उदघाटना नंतर सांस्कृतिक कार्यक्रमांचे उद्धाटन प्राचार्य डॉ सुभाष राठोड उप प्राचार्य रामदास ढोकळे कार्यालयीन अधीक्षक धनंजय पाटील प्राध्यापक नेताजी जाधवप्रकाश चौगुले शहबाज काझी सहाय्यक पोलीस निरीक्षक ईश्र्वर नांगरे डॉ आंबेडकर इंटरनॅशनल इंग्लिश मीडियम स्कूलचे संस्थापक तथा मुख्य प्रवर्तक मारुती खारवे सेवानिवृत्त मुख्याध्यापक शिवाजीराव व ऱ्हाडे सामाजिक कार्यकर्त्या कल्पना गायकवाड सेवानिवृत्त मुख्याध्यापिका संगीता शहा प्रा डॉ पांडुरंग पोळ , प्रा. दिपक जगदाळे कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ सुभाष राठोड यांनी केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि निवेदक प्रा डॉ पंडित गायकवाड प्रा डॉ संतोष पवार यांनी केले एकूण ३५ विद्यार्थ्यांनी या विविध गुणदर्शनाच्या कार्यक्रमांमध्ये सहभाग नोंदविला होता या सांस्कृतिक कार्यक्रमात अनेक विद्यार्थी विद्यार्थिनीनी कलाकृती सादर केली या कार्यकमाने सर्वांचे अभिनंदन व कौतुक होत आहे शेवटी आभार प्रा डॉ पांडुरंग पोळ यांनी मानले .

# अस्सल शाहिरी बाण्यातून पंढरपूरकरांनी घेतले शिवचरित्राचे ज्वलंत दर्शन





पंढरपूर/प्रतिनिधीः शिवजन्मोत्सवानिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे नेते तथा श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अभिजीत पाटील यांच्या आज माध्यमातून शिव व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. आपल्या नावीन्यपूर्ण संकल्पनांमधून चेअरमन श्री.अभिजीत धनंजय पाटील हे नेहमीच पंढरपूरकरांसाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करीत असतात.

## अभिजीत पाटील यांच्या माध्यमातून सलग तीन दिवस व्याख्यानमालेचे शिवतीर्थावर आयोजन

शिवजयंतीच्या पार्श्र्वभूमीवर या व्याख्यानमालेचे अभिनव आयोजन त्यांनी केले आहे. या व्याख्यानमालेचे दुसरे पुष्प शिवशाहीर श्री.राजेंद्र कांबळे यांच्या शाहिरी व पोवाड्याच्या कार्यक्रमाने संपन्न झाले.. महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवरायांचे जीवन चरित्र केवळ महाराष्ट्र अथवा भारत नव्हे तर संपूर्ण जगासाठी प्रेरणादायी आहे.. शिवचरित्रातून विचारांची मोठी प्रेरणा मिळते. आपल्या अद्वितीय शाहिरी बाण्याने श्री.राजेंद्र कांबळे यांनी उपस्थित प्रेक्षकांना खिळवून ठेवले होते.. अंगावर शहरा आणणाऱ्या त्यांच्या उद्बोधक वाणीतून हजारो प्रेक्षकांनी या कार्यक्रमाचा लाभ घेतला. या व्याख्यानमालेचा मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आयोजकांनी आवाहन केले आहे..यावेळी चेअरमन अभिजीत पाटील,माजी नगराध्यक्ष सुभाष भोसले, श्रीरंगबापू बागल, संतोष कवडे, मोहम्मद उस्ताद, सौदागर मोळक, आरपीआयचे संतोष पवार, ड.किर्तीपाल सर्वागोड,रिपब्लिकन पक्षाचे नेते आप्पासाहेब जाधव, संचालक सचिन पाटील, प्रवीण भोसले, गोरख ताड, दत्तात्रय माने, रेडगावचे सरपंच सुनील थोरबोले, गादेगावचे बाबासाहेब बागल, संचालक जनक भोसले, शंकर शिंदे-नाईक, माऊली आटकळे, काकासाहेब मोरे, दिनकर चव्हाण, आनंद पाटील, अमित साळुंखे, रायाप्पा हळणवर, तानाजी बागल यासह आदी मान्यवर उपस्थित होते...

# कौशल्य प्रशिक्षण कोल्हापुरी फाउंडेशन कोल्हापूर सैनिक टाकळीत प्रशिक्षणाचा समारोप



सैनिक टाकळी : ता. शिरोळ येथील ग्रामपंचायत हॉलमध्ये ग्रामपंचायत १५ वा वित्त आयोग मार्फत गावातीत महिलांना कौशल्य प्रशिक्षण देणे अंतर्गत कलापूरी- फांऊडेशन, कोल्हापूर यांच्या वतीने गेल्या एक महिन्या पासून अधिक काळ गावातील महिलांना बास्केट तयार करण्याचे प्रशिक्षण देण्यात आले .या प्रशिक्षणाचा समारोप ग्रामपंचायत सभागृहात पार पडला.

कलापूरी फांउडेशनच्या वतीने प्रा. श्रीधर वैध्य, अर्पणा चव्हाण यांनी मनोगते केली.

त्यांनी या प्रशिक्षणामध्ये प्रशिक्षित झालेल्या महिलांनी पूढे येऊन भविष्यात कलापूरी फांउडेशन सोबत काम करत रहावे अशी अपेक्षा व्यक्त केली. कार्यक्रमाचे आभार माजी उपसरपंच सुदर्शन भोसले यांनी मानले. यावेळी ग्रामसेवक सुनील वाघमोडे, सचिन कोळी, राम पाटील, श्रीकांत भोसले यांच्यासह प्रशिक्षणार्थी महिला उपस्थित होत्या.

# मा.उच्च न्यायालयाच्या स्थगिती आदेशानंतरही शेलार ग्राम पंचायत निवडणूकीचा घाट

## प्रशासकीय अधिकारी आमदार खासदारांच्या दबावाखाली काम करत असल्याचा सरपंचांचा आरोप

भिवंडीः शहरा लगत असलेल्या शेलार ग्राम पंचायतीच्या काही सदस्यांनी सदस्य पदाचा राजीनामा दिल्या नंतर त्या जागी फेर निवडणूक कार्यक्रम घेण्या ऐवजी थेट ग्राम पंचायत कार्यकारणी बरखास्त करून निवडणूक घेण्याचा घाट घातला जात असून ग्राम पंचायतीच्या सदस्यांनी दिलेला राजीनामा बेकायदेशीर असून त्याविरोधात मा.उच्च न्यायालयाने स्थगिती आदेश दिले असून व प्रकरण न्यायप्रविष्ठ असतांना, केवळ सरपंच पद अनुसूचित जातीसाठी राखीव असल्यानेच सत्ताधारी आमदार खासदार प्रशासकीय अधिकाऱ्यांवर दबाव टाकून निवडणूक घेण्याचा घाट घालत असल्याचा आरोप शेलार ग्राम पंचायतीचे सरपंच तथा आरपीआय सेक्युलरचे प्रदेश सरचिटणीस ऍड.किरण चन्ने यांनी शनिवारी सनोबर हॉल येथे आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत केला आहे.या पत्रकार परिषदेत उपसरपंच ललित शेळके,ग्रा.सदस्या दीपिका प्रमोद भोईर,सरिता ज्ञानेश्र्वर भोईर,उषा दशरथ तपासे, सदस्य नंदकुमार जाधव, प्रमोद माळी यांच्यासह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



शेलार ग्रामपंचायती मध्ये एकूण १७ सदस्य असून त्यापैकी ९ सदस्यांनी आपल्या ग्रामपंचायत सदस्य पदाचा राजीनामा दिला होता.याबाबत कोकण आयुक्तांकडे १ जानेवारी २०२४ रोजी सुनावणी घेण्यात आली व २ जानेवारी रोजी निर्णय देऊन तत्काळ कोकण आयुक्तांनी केवळ ९ सदस्यांनी राजीनामे दिले म्हणून ग्राम पंचायतीच्या रिक्त जागांवर फेर निवडणूक न घेता ग्रामपंचायत बरखास्त केली.कोकण आयुक्तांच्या या बेकायदेशीर व घाईघाईच्या निर्णया विरोधात आपण मा.उच्च न्यायालयात ४ जानेवारी रोजी जनहित याचिका दाखल केली असून मा.उच्च न्यायालयाने या संदर्भात स्थगिती आदेश दिले असून सध्या हे प्रकरण न्याय प्रविष्ठ आहे.मात्र तरी देखील महसूल अधिकाऱ्यांनी शेलार ग्राम पंचायतीच्या निवडणुकीचा कार्यक्रम निव्वळ वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या दूरध्वनी आदेशावरून जुलै २०२४ मध्ये घेण्याचे आदेश पारीत केले आहेत.या बेकायदेशीर आदेशांच्या मागे स्थानिक आमदार व खासदारांचा हात असून त्यांच्या दबावाला बळी पडूनच अधिकाऱ्यांनी मा.उच्च न्यायालयाच्या स्थगिती आदेशाचा विचार न करता शेलार ग्राम पंचायतीचा निवडणूक कार्यक्रम जाहीर केला असल्याचा आरोप देखील चन्ने यांनी यावेळी केला आहे.

शेलार ग्राम पंचायत हि तालुक्यात लोकसंख्या व आर्थिक सुबत्तेच्या बाबतीत तिसऱ्या क्रमांकाची ग्राम पंचायत असून या ग्राम पंचायतींवर माझ्या सारख्या दलित सुशिक्षित वकील सरपंच असल्याचा राग काही जातीअंध लोकप्रतिनिधींमध्ये आहे.आपण गावात केलेली विकास कामे देखील काहींना राजकीय दृष्टया खुपत आहे.मला सरपंच पदावरून पायउतार करण्यासाठीच सत्तेतील आमदार व खासदार प्रयत्न करीत असून माझ्या उच्च शिक्षण घेणाऱ्या दोन मुलांवर व जवळच्या कार्यकर्त्यांना खोट्या पोलीस केस दाखल केल्या असून मला शारीरिक व मानसिक त्रास देण्याचा प्रयत्न सुरु असून माझ्या जीवाला धोका असल्याची माहिती देखील चन्ने यांनी यावेळी दिली.

सत्तेतील लोकप्रतिनिधींचा वाढता दबाव तसेच महसूल व पोलीस यंत्रणेचा बेकायदेशीर वापर व या दबाव तंत्रा विरोधात २३ फेब्रुवारी रोजी भिवंडी तहसीलदार कार्यलयावर सर्व जातीधर्मीय व सर्व भाषिक जनतेच्या सकल भारतीय समाजच्या वतीने मोर्चा आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती शेवटी सरपंच ऍड.किरण चन्ने यांनी दिली आहे.

# श्री गुरुदत्त शुगर्स चे किसान कार्ड योजना शेतकऱ्यांना ठरत आहे वरदान

टाकळीवाडी : तालुका शिरोळ येथील श्री गुरुदत्त शुगर्स लिमिटेड या कारखान्याने गुरुदत्त किसान कार्ड योजना २०१७/१८ पासून चालू केलेली आहे. या योजनेअंतर्गत प्रति टन रक्कम ३३००/- प्रमाणे दर दिला जातो. तसेच ५/- रुपये दराने प्रति टन २ किलो साखर वितरित केली जाणार आहे. या योजनेतून एकूण प्रति टन ३४५१/-चा लाभ होत आहे. तसेच गुरुदत्त किसान कार्ड विमा योजनेअंतर्गत अपघाती मृत्यू झाल्यास १०००००/-लाख रुपये चा विमा दिला जाणार आहे. या योजनेतून शेतकरी कुटुंबाला एक प्रकारचे आरोग्य सुरक्षा कवच देण्याचे सामाजिक कार्य श्री गुरुदत्त साखर कारखाना करत आहे. असंख्य शेतकऱ्यांना या योजनेचा फायदा झालेला आहे. सदर योजना ही २०/०२/ २०२४ पर्यंत नाव नोंदणी करावी असे आवाहन करण्यात येत आहे.

### कराओके ऑर्केस्ट्राचे आज मोफत आयोजन

सोलापूर : येथील गायक वासू व्हटकर यांच्यातर्फे उद्या(रविवारी) सायंकाळी सहा वाजता हुतात्मा स्मृती मंदिर येथे कराओके ऑर्केस्ट्रा सुपर सिंगिंग शोचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये गायक व्हटकर यांच्यासह युसुफ पिरजादे, राजू गायकवाड, एन.के. कटकधोंड, ताजोद्दीन, अनुराधा गंगुल, मेघा साळुंके, संजीवनी सिदगणे, अश्विनी आदी कलावंत विविध हिंदी व मराठी गाणी सादर करणार आहेत

# पुरंदर तालुका रिपब्लिकन श्रमिक ब्रिगेडच्या तालुका अध्यक्षपदी भिवा वळकुंदे

पुरंदर/प्रतिनिधीः रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले श्रमिक ब्रिगेडच्या पुरंदर तालुका अध्यक्षपदी भिवा बिरू वळकुंदे यांची श्रमिक ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष डॉक्टर सतीश केदारी यांनी नियुक्ती केली. रिपब्लिकन पक्षाचे राज्याचे नेते माजी आमदार ऍड एल टी सावंत यांनी भिवा वळकुंदे यांना सासवड येथे नियुक्त पत्र देऊन वळकुंदे यांची पुरंदर तालुका रिपब्लिकन श्रमिक



ब्रिगेडच्या तालुका अध्यक्षपदी नियुक्ती झाल्याचे घोषित केले.यावेळी रिपब्लिकन श्रमिक ब्रिगेडचे प्रदेश कार्याध्यक्ष विष्णू दादा भोसले,प्रदेश सचिव कल्याण आढागळे,स्टीवन जोसेफ,सुरज गायकवाड,सुभाष सहजराव,पुरुषोत्तम पवार,नामदेव नेटके,गुलाब सोनवणे,स्वप्निल पाटोळे,विजय घोडेस्वार,सुनील जगताप,ज्ञानोबा वाघमारे,आनंद लकडे,महादेव खेंगरे पाटील यासह विविध पदाधिकारी उपस्थित होते भिवा वळकुंदे गेली अनेक वर्ष रिपब्लिक पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री नामदार रामदासजी आठवले साहेब यांचे नेतृत्वाखाली रिपब्लिकन पक्षात काम करीत आहे रिपब्लिकन पक्षाच्या एसटी एनटी तालुका अध्यक्षपदी त्यांनी काम केले आहे.वळकुंदे हे पुरंदर तालुक्यातील नीरा शिव तक्रार येथील रहिवासी आहेत त्यांची रिपब्लिकन श्रमिक ब्रिगेडच्या तालुका अध्यक्षपदी नियुक्ती झाल्याने अनेकांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# मोहोळ तालुका पेनुरचे मानाजीराव माने शाळेसाठी खरे यांच्या प्रयत्नातून २१ लाखाचा निधी



पंढरपूर/राजेंद्र कोरके पाटीलः मोहोळ विधानसभा राखीव मतदार संघाचे शिवसेनेचे संभाव्य उमेदवार उद्योजक राजूभाऊ खरे यांनी मतदार संघात मदत कार्य करण्याचा सपाटा सुरू केला आहे अशातच मोहोळ पंचायत समितीचे माजी सभापती आणि ज्येष्ठ नेते मानाजीराव माने यांच्या शाळेच्या इमारत बांधकामासाठी तब्बल २१ लाखाचा निधी उपलब्ध करून दिला आहे पेनुर येथील एका कार्यक्रमानिमित्त उद्योजक राजूभाऊ खरे गेले होते त्यावेळी या इमारतीची अवस्था पाहून खरे यांनी आपणच या शाळेसाठी लागेल तेवढी मदत करू असे आश्र्वासन दिले होते त्यानुसार मागील महिन्यात अकरा लाख रुपये आणि शनिवारी दहा लाख रुपये दनादेश गोपाळपूर येथील फार्म हाऊसवर उद्योजक राजूभाऊ खरे आणि त्यांच्या पत्नी सौ तृप्ती ताई खरे यांच्या हस्ते वरील धनादेश दिला आहे

हा धनादेश स्वीकारताना बानाजी बापू माने यांचे चिरंजीव युवा नेते विक्रम माने मुख्याध्यापक देविदास रणदिवे सहशिक्षक राजाराम गायकवाड तानाजी जाधव तानाजी कांबळे गुरुनाथ माने कल्याण वाघमारे पांडुरंग जगताप अमोल वाघमारे अनिल राजगुरू समाधान सावंत तानाजी माने आधी जण उपस्थित होते

# भोसे पाटी येते मनोज जरांगे पाटील यांच्या समर्थ नार्थ रस्ता रोको

पंढरपूर/राजेंद्र कोरके पाटीलः मराठा आरक्षण आंदोलन पंढरपूरच्या सर्व रस्त्यावर रस्ता रोको मनोज तरंगे पाटील यांच्या समर्थनार्थ; भुशी चौकात दोन तास वाहतूक ठप्प मराठा आरक्षण आंदोलन पंढरपूरच्या सर्व रस्त्यावर रस्ता रोको मनोज जरांगे पाटील यांच्या समर्थनार्थ मोशी चौकात दोन तास वाहतूक ठप्प



मराठा आरक्षण आंदोलन मनोज तरंगे पाटील यांच्या समर्थनार्थ शनिवार रोजी पंढरपूर शहरात येणाऱ्या सर्व मार्गावर रस्ता रोको आंदोलन करण्यात आलेली आहे त्यानुसार सकाळी दहा वाजल्यापासून पंढरपूर शहरात येणाऱ्या सर्व मार्गावर रस्ता रोको आंदोलन होणार आहे अशी माहिती पंढरपूर सर्व तालुका सकल मराठा समाज समाजाच्या वतीने दहा वाजल्यापासून बारा वाजेपर्यंत मोशी चौकात रस्ता रोको केली त्यावेळी भोसे आणि परिसरातील शेकडून मराठा समाज. यावेळी उपस्थित प्रा महादेव तळेकर भारत कोरके प्रा सुभाष मस्के विश्र्वनाथ भिंगारे सचिन भिंगारे नितीन तळेकर चांगदेव तळेकर सचिन भिंगारे महादेव तळेकर अमर पाटील प्रा सतीश देशमुख महेश खटके मराठा मोर्चा समन्वयक रामभाऊ गायकवाड नामदेव कोरके धनाजी तळेकर राजकुमार टरले हनुमंत मोरे भास्कर कोरके नारायण कोरके राजू जमदाडे देवा जमदाडे मारुती कोरके हरी तळेकर तानाजी भिंगारे सरडे सजन भोसले विजय गायकवाड सोमनाथ सरडे संतोष कोरके दीपक खुळे आदिजन उपस्थित होते

यावेळी आंदोलन दरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी कर्कम पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री सागर कुंजीर यांच्या मार्गदर्शनाखाली अतिशय चूक बंदोबस्त ठेवण्यात आला होता

# सर्व नोडल अधिकाऱ्यांनी दिलेली जबाबदारी काटेकोरपणे पार पाडावी : जिल्हा निवडणूक अधिकारी कुमार आशीर्वाद

## स्वीप(SVEEP) अंतर्गत मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी विविध प्रबोधनात्मक कार्यक्रमाचे आयोजन करावे

सोलापूर/प्रतिनिधीः लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने सर्व नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. तरी सर्व संबंधित नोडल अधिकारी यांच्यावर सोपवलेली जबाबदारी अत्यंत काटेकोरपणे पार पाडावी, असे निर्देश जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिले.

दुरदृश्य प्रणालीद्वारे आयोजित लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने पूर्वतयारी आढावा बैठकीत जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद बोलत होते. यावेळी सोलापूर शहर पोलीस आयुक्त एम. राजकुमार, पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, अपर जिल्हाधिकारी मोनिका सिंग-ठाकूर, अतिरिक्त पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर, उत्पादन शुल्क अधीक्षक नितीन धार्मिक, निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार, उप जिल्हा निवडणूक अधिकारी गणेश निऱ्हाळी, सर्व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी, सर्व नोडल अधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी, तहसीलदार व गटविकास अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी आशीर्वाद म्हणाले की, भारत निवडणूक आयोगाने लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने ज्या मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत त्या सूचनांचे वाचन करावे. दिलेली जबाबदारी समजून घेऊन त्यानुसार तंतोतंत काम करावे. निवडणूक कामात कोणत्याही प्रकारचा हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नाही याबाबत दक्षता घ्यावी. तसेच सर्व सहाय्यक निवडणूक अधिकारी, सर्व उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांनी असुरक्षित भागाची (Vulner-able mapping) पहिली भेट त्वरित पूर्ण करून संबंधित सेक्टर ऑफिसर व पोलीस अधिकारी यांची बैठक घ्यावी, असे त्यांनी सूचित केले.



सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी, तहसीलदार यांनी ज्या मतदान केंद्रावर अथवा संपूर्ण गावांमध्ये मतदान प्रक्रियेवर बहिष्कार जाहीर केलेला आहे याबाबत निवेदन प्राप्त झाले असेल किंवा माहिती प्राप्त झाली असेल तर त्या ठिकाणी तात्काळ जाऊन संबंधित गावांतील लोकांची समजूत काढावी व बहिष्कार घालण्यापासून परावृत्त करावे तसेच त्याबाबतचा अहवाल प्रशासनाला त्वरित सादर करावा. त्याप्रमाणेच प्रत्येक विधानसभा निहाय ईव्हीएम मशीन ठेवण्यासाठी स्ट्राँग रूम आहेत त्या स्ट्राँग रूमची उपविभागीय अधिकारी उपविभागीय पोलीस अधिकारी तहसीलदार सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता त्यांनी संयुक्त पाहणी करावी. निवडणूक आयोगाच्या सूचनेप्रमाणे स्ट्राँग रूम असली पाहिजे याची काळजी घ्यावी, अशा सूचना जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिल्या.

निवडणूक आयोगाच्या सूचनेप्रमाणे जिल्ह्यात स्वीप(SVEEP) कार्यक्रमाची अत्यंत प्रभावीपणे अंमलबजावणी झाली पाहिजे यासाठी स्वीप चे नोडल अधिकारी तसेच सर्व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी व तहसीलदार गटविकास अधिकारी यांनी विविध कार्यक्रम राबवून मतदारांमध्ये जनजागृती करावी व मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी प्रयत्न करावेत असे जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी सांगितले.

निवडणूक आयोगाच्या सूचनेप्रमाणे जिल्ह्यात स्वीप(SVEEP) कार्यक्रमाची अत्यंत प्रभावीपणे अंमलबजावणी झाली पाहिजे यासाठी स्वीप चे नोडल अधिकारी तसेच सर्व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी व तहसीलदार गटविकास अधिकारी यांनी विविध कार्यक्रम राबवून मतदारांमध्ये जनजागृती करावी व मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी प्रयत्न करावेत असे जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी सांगितले.

यावेळी सोलापूर शहर पोलीस आयुक्त एम. राजकुमार तसेच पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे यांनीही निवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवर पोलीस विभागाकडून शहरी व ग्रामीण भागात करण्यात येत असलेल्या विविध उपायोजना, मतदान केंद्रावर देण्यात येणारा पोलीस बंदोबस्त, चेक पोस्ट आदी माहिती दिली. त्याप्रमाणेच शहर व ग्रामीण भागातील खाजगी व्यक्तीकडे असलेले शस्त्रे जमा करण्याच्या अनुषंगाने कार्यवाही सुरू असल्याचेही सांगितले.

प्रारंभी उपजिल्हा निवडणूक अधिकारी गणेश निऱ्हाळी यांनी लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने निवडणूक प्रशासनाकडून सुरू असलेल्या कामकाजाची माहिती दिली. तसेच मनुष्यबळ व्यवस्थापन, ईव्हीएम मॅनेजमेंट, निवडणूक प्रशिक्षण, संगणकीकरण, खर्च समिती, मिडिया सेंटर, आदर्श आचारसंहिता कक्ष अशा १६ नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आलेली असून आणखी ४ नोडल अधिकारी नियुक्त करण्यात येणार असल्याचे सांगितले.

# भारतातील कला संस्कृती हा अमूल्य ठेवा नाट्य संस्थेच्या प्रमुख डॉ. इंदूजी नायर

### स्वेरीत 'स्पीक मॅके' तर्फे केरळचा 'कोडीयट्टम' हा कार्यक्रम संपन्न





पंढरपूर/प्रतिनिधी : 'भारताच्या विविध भागातील भाषा, संस्कृती, कलाप्रकार, खाद्य हे सर्व वेगवेगळे असताना भारतीयांनी मात्र आपल्या संस्कृती व परंपरांचे खुप सुंदररीत्या जतन केले आहे. आपल्या भागात एखादा पाहुणा आला तर आपण त्यांचे स्वागत आपल्या अंगीकृत कलाप्रकाराने करतो. त्यामुळे भारताची कला संस्कृती हा एक अमूल्य ठेवा आहे आणि त्याचे खूप कौतुक वाटते.' असे प्रतिपादन केरळ मधील नाट्य संस्थेच्या प्रमुख डॉ. इंदूजी नायर यांनी केले.

अलीकडच्या काळात, मोबाईलच्या युगात युवावर्ग व्यस्त असल्याचे दिसून येत आहे. यामुळे जुनी परंपरा, कला नृत्य अविष्कार, गायन, संगीत, पारंपारिक वेशभूषा, लोकभूषा, आपसातील संवाद हे कमी होत चालले आहेत. यामुळे पाश्र्चात्य कला संस्कृती देखील जवळपास लोप पावत चालली आहे. त्यामुळे येणाऱ्या पिढीला हे सर्व कलाप्रकार एका बंदीस्त चित्रातच पहायला मिळणार आहेत असे वाटते. असे असताना स्वेरीमध्ये नुकताच 'स्पीक मॅके'च्या माध्यमातून 'कोडीयट्टम' हा दक्षिणात्य कलाप्रकार सादर करण्यात आला. याला विद्यार्थ्यांनी प्रचंड प्रतिसाद दिला. स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग व 'स्पीक मॅके' यांच्या संयुक्त विद्यमाने केरळ भागातील पुरातन संस्कृत नाटक असलेल्या 'कल्याण सौगंधी' या नाटकातील 'कोडीयट्टम' हा कला प्रकार केरळच्या मुरब्बी कलावंतांनी मुक नृत्याद्वारे सादर करून विद्यार्थ्यांच्या टाळ्या मिळविल्या. 'स्पीक मॅके' चा समूह भारतीय संस्कृतीचा सर्वांगीण विकास करण्याचे कार्य करत आहे. विद्यार्थ्यांना भारतीय शास्त्रीय संगीत, नृत्य, कला आणि साहित्याच्या सार्थक अनुभवाचे संवर्धन करणे हा या संघटनेचा मुख्य उद्देश आहे. या पार्श्र्वभूमीवर 'स्पीक मॅके' च्या वतीने स्वेरीत 'कोडीयट्टम' या कलाप्रकाराचे आयोजन केले होते. यावेळी 'केरळ' मधील नाट्य संस्थेच्या प्रमुख डॉ. इंदूजी नायर हया भारतीय संस्कृतीचे मनसोक्त कौतुक करत होत्या. प्रारंभी स्वेरीचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे यांनी केरळहून आलेल्या कलावंतांचे स्वागत केले. नाट्य संस्थेच्या प्रमुख डॉ. इंदूजी नायर कोडीयट्टम या नृत्यकलेचे महत्त्व सांगताना पुढे म्हणाल्या की, 'कोडीयट्टम' हे एक प्राचीन भारतीय लोकनृत्य असून ज्याचा मुख्य स्रोत केरळ राज्यातील 'कुट्टनाड' आहे. या नृत्य प्रकारात पौराणिक कथा, संस्कृत भाषेत नाटय आणि नृत्य स्वरूपात सादर केली जाते.' 'कोडीयट्टम' चे प्रमुख सांगितीक वाद्य कुंजियाटम, कुझित्ताळं, एतक्का, कुरूंकुझल आणि शंख याचा वापर केला जातो.' असे सांगून 'कोडीयट्टम' नृत्यकलेबद्दलचे महत्त्व सांगितले. मार्गी मधु यांनी 'कोडीयट्टम' नृत्याचे जबरदस्त सादरीकरण केले. चेहऱ्यावरील हावभाव, मुकपट यांच्या माध्यमातून त्यांनी विद्यार्थ्यांना उत्तम कला प्रकाराचे दर्शन दिले. पद्मभूषण पुरस्कार प्राप्त अम्मानूर माधव चकियार आणि त्यांचे वडील मझिक्कलूम कोचुकुत्तम यांच्याकडून मार्गी मधु यांनी ही सुंदर कला आत्मसात केली आहे. त्यांनी वेशभूषा आणि हात-पायांच्या अजब हालचालीद्वारे मुकपट सादर केला. या नाट्य प्रकाराला जितेश पी. चकियार, बी.एस.मणीक नंदन आणि राजन यांनी सुमधुर वाद्य, केरळा ढोलकी, तबला वाजवून समर्पक अशी साथ दिली तर श्रीजीत यांनी वेशभूषेचे काम पाहिले.

केरळचे कलावंत मार्गी मधु यांच्या लक्षवेधी नृत्याने, वन्यप्राण्यांच्या सुक्ष्म हालचालीचे परीक्षण करून केलेले नृत्य पाहून स्वेरीचे विद्यार्थी भारावून गेले. यावेळी सेवानिवृत्त पशुवैद्यक अधिकारी डॉ. विश्र्वासराव मोरे, सर्व प्राचार्य, प्रवेश प्रक्रिया अधिष्ठाता प्रा. करण पाटील यांच्यासह प्राध्यापक, विद्यार्थी व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. सूत्रसंचालन सोनाली करवीर यांनी केले तर संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे यांनी केरळच्या कलावंतांनी सादर केलेल्या कलेचे कौतुक करून पश्र्चात कला संस्कृतीचे जतन करणे आवश्यक असल्याचे सांगून उपस्थितांचे आभार मानले.

# अनुदानासह २८०० प्रमाणे ऊस बिल शेतकऱ्यांच्या खात्यात जमा

## मार्चमध्ये गाळपास येणाऱ्या ऊसास २८५० प्रमाणे दर मिळणार; ३१ जानेवारी अखेर ऊस तोडणी वाहतूक बिल देणारा एकमेव कारखना : आ.बबनराव शिंदे



माढा/प्रतिनिधीः विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखान्याचे युनिट नं. १ पिंपळनेर व युनिट नं.२ करकंब कारखान्याकडे ०१ ते १० फेब्रुवारी दरम्यान गळीतास आलेल्या ऊसाचे अनुदानासह प्रति टन रू.२८००/- प्रमाणे ऊस बिल शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्यात आले असून ३१ जानेवारी अखेर ऊस तोडणी वाहतूक बिले वाहनमालकांच्या खात्यावर जमा करणेत आले असल्याची माहीती संस्थापक अध्यक्ष आ. बबनराव शिंदे यांनी दिली. अधिक माहीती देताना आ.शिंदे म्हणाले की, विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखान्याचे युनिट नं. १ पिंपळनेर व युनिट नं.२ करकंब येथील सन २०२३-२४ चा गाळप हंगाम सुरू असून युनिट नं.१ येथे आजअखेर १३ लाख ०३ हजार ५५६ मे.टन व युनिट नं. २ येथे आज अखेर ४ लाख ५१ हजार ५४२ मे.टन ऊस गाळप झाले आहे. दोन्ही युनिटचे मिळून आजअखेर १७ लाख ५५ हजार ०९८ मे.टन ऊसाचे गाळप झालेले आहे. या हंगामामध्ये दोन्ही युनिटकडे कडे ०१ ते १० फेब्रुवारी २०२४ या कालावधीत गाळपास आलेल्या सर्व ऊसास जाहीर केलेप्रमाणे प्रति टन रू.१००/- अनुदानासह प्रति टन रू.२८००/- प्रमाणे ऊस बिल शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आला आहे. त्यापोटी कारखान्याने ४५ कोटी ५१ लाख बँकेत जमा केले आहेत. तसेच दोन्ही युनिट कडे ऊस तोडणी वाहतूकीसाठी असलेल्या वाहनचालकांची ३१ जानेवारी अखेरपर्यंतची तोडणी वाहतूक बिले अदा करण्यात आली आहेत. १६ ते ३१ जानेवारी या कालावधीचे तोडणी वाहतूक बिलापोटी कारखान्याने १७ कोटी १९ लाख बँकेत जमा केले आहे. ऊस व तोडणी वाहतूक बिलाची मिळून ६२ कोटी ७० लाख रुपये रक्कम शेतकऱ्यांच्या व वाहनमालकांच्या खात्यावर जमा करणेत आले आहेत. १ ते २८ फेब्रुवारी दरम्यान गाळपास येणाऱ्या ऊसास अनुदानासह प्रतिटन रू.२८०० /- व १ मार्च पासून पुढे गाळपास येणाऱ्या ऊसास प्रति टन रू.२८५०/- प्रमाणे उत्तेजनार्थ वाढीव ऊस दर सर्व ऊस पुरवठादार सभासद यांना मिळणार आहे. तरी सभासद व ऊस पुरवठादार शेतकऱ्यांनी आपला सर्व ऊस विठ्ठलराव शिंदे कारखान्याचे युनिट नं.१ पिंपळनेर व युनिट नं. २ करकंब कारखान्यास पुरवठा करुन सहकार्य करावे असे आवाहन संस्थापक अध्यक्ष आ. बबनराव शिंदे यांनी केले. सदरप्रसंगी कारखान्याचे सर्व संचालक मंडळ, कार्यकारी संचालक, जनरल मॅनेजर व अधिकारी उपस्थित होते.



**मैदानी शारीरिक कवायत** सुदृढ शरीरात सुदृढ मन वास करते ही म्हण जुळवायला प्रत्येक मानवाने स्वतः च्या शरीराची निगा राखण्यासाठी दररोज व्यायाम करणे आवश्यक आहे, व्यायाम केल्यामुळे मानवी शरीर हे तंदुरुस्त राहून रोग प्रतिकारशक्ती वाढते व शरीर निरोगी राहते. हे तत्त्व जपण्यासाठी नंगपूरा मुर्री येथील अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळेमध्ये वर्ग सहावी ते दहावीचे सर्व विद्यार्थी व शिक्षक शनिवारी सकाळी ०८.३० वाजता मैदानावर शारीरिक कवायत व्यायाम करताना छायाचित्र टिपले. **छायाचित्र – मुन्नाभाई नंदागवळी गोदिंया**

## राष्ट्रवादी ओबीसी विभागाची कार्यकारिणी जाहीर

सोलापूर/प्रतिनिधीः राष्ट्रवादी काँग्रेस अजितदादा गटाच्या शहर ओबीसी विभागाची कार्यकारिणी प्रदेशाध्यक्ष कल्याण आखाडे यांच्या मान्यतेने शहर ओबीसी विभागाचे अध्यक्ष अनिल छत्रबंद व कार्याध्यक्ष इरफान शेख यांनी जाहीर केली.नूतन पदाधिकाऱ्यांना राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष संतोष पवार व कार्याध्यक्ष जुबेर बागवान यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आले. यावेळी ओबीसी विभागाचे प्रदेश उपाध्यक्ष बशीर शेख, अ‍ॅड. सलीम नदाफ, युवक प्रदेश सरचिटणीस खलील शेख अल्पसंख्यांक कार्याध्यक्ष रियाज शेख उपस्थित होते.

नूतन कार्यकारिणी पुढीलप्रमाणेउपाध्यक्ष मारुती पुजारी, आयुब शेख, मिनाज बागवान, शकील नदाफ, सचिव अर्जुन माळी, गणेश विटकर, सरचिटणीस अमोल मोरे, इमाम सय्यद, शकील सुगूर, संघटक वीरभद्र मदगिरी, राहुल माळी. कार्यक्रमाचे प्रास्ताविक वैद्यकीय मदत कक्ष विभागाचे बसू कोळी यांनी केले. आभार अर्जुन माळी यांनी मानले.

# ईटकुर मध्ये भव्य आनंद अनुभूती शिबिर मोठया उत्साहात

ईटकुर/सुधाकर रणदिवे : कळंब तालुक्यातील ईटकुर येथे दि.१२ फेब्रुवारी ते १७ या कालावधी मध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्ताने व आर्ट ऑफ लिव्हिंग परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने या शिबिराचे आयोजन केले होते. या शिबिरामध्ये सूक्ष्म योगा, सूर्यनमस्कार, योगासने, प्राणायाम, सुदर्शन क्रिया, ध्यान, व ज्ञानसुत्र, अशा अनेक प्रकारचे प्रशिक्षण देऊन आलेल्या सर्व प्रशिक्षणार्थी यांची मने जिंकुन त्यांना एक नवीन आदर्श डोळ्यासमोर ठेवून आपल्या आरोग्याची काळजी कशी घ्यायची, राग द्वेष, यापासून कसं आलीप्त राहायचं, अशा अनेक प्रकारच्या माहिती या शिबिरामधून दिल्या, व्यसनमुक्ती, इतरा सोबत कसं वागायचं, त्यांच्याशी आपुलकी कशी साधायची, मनामध्ये सदैव चांगले विचार आनने, सदैव पॉझिटिव्ह थिंकिंग वापरायची, घरामध्ये सासू सुनाचे वातावरण कसे आनंदी राहिले पाहिजे, व त्याचसोबत सूक्ष्म योगा, सूर्यनमस्कार, योगासने, प्राणायाम, सुदर्शन क्रिया, ध्यान, व ज्ञानसुत्र, यांचे प्रशिक्षण देण्यात आले. या प्रशिक्षणासाठी जालन्याचे महाराष्ट्र राज्य समन्वयक आर्ट ऑफ लिव्हिंग श्री, आशिष भैया बोरडे सर यांनी प्रशिक्षण दिले. हे ६ दिवसाचे प्रशिक्षण झाल्यानंतर समारोपाच्या दिवशी प्रत्येकाने आपापले मनोगत व्यक्त केले. या संस्थेचे १८० देशांमध्ये काम चालू आहे, विनामूल्य मुलांची शाळा चालू आहेत, तसेच या संस्थेचे आयुर्वेदिक औषधे, ग्रहउपयोगी लागणारे सर्व प्रकारचे केमीकल फ्री ईत्यादी प्रोडक्ट घरपोच सुद्धा मिळतात. या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष श्री श्री रविशंकर गुरुजी यांच्या मार्गदर्शनाखाली हे सर्व काम चालू आहे.ईटकुर मध्ये या प्रशिक्षणाचे आयोजन, सार्वजनिक शिवजन्मोत्सव समिती व आर्ट ऑफ लिव्हिंग ईटकुर हरिदास (दादा) पावले, अभय सिंह आडसूळ, हेमंत पोते, सचिन (पप्पु )गंभीरे, वसंत (बप्पा) आडसूळ, पत्रकार बालाजी ( बाप्पा) आडसूळ, विजय (दादा) माने, वसंत सुतार, बिबीशन देसाई, दत्ता साखरे, राहुल तोरगले, यांनी केले. या शिबिरासाठी तरुण वर्ग व महिला मोठ्या प्रमाणात उपस्थित होते...





## महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट पुरस्कार सोहळा २२ फेब्रुवारीला

मुंबई : कोरोनामुळे रखडलेल्या २०१९ मधील मराठी चित्रपटांचा ५७ व्या महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट पुरस्कार सोहळा २२ फेब्रुवारीला संपन्न होणार आहे. याच सोहळ्यात अशोक सराफ यांना महाराष्ट्र भूषण आणि पं. सुरेश वाडकर यांना गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. ५६ वर्षे महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट पुरस्कार सोहळ्याचे आयोजन सांस्कृतिक कार्य संचालनालय करत होते. एप्रिल २०२३ पासून ही जबाबदारी फिल्मसिटीकडे सोपवण्यात आली आहे. २२ फेब्रुवारीला वरळीतील एनएससीआय डोममध्ये हा सोहळा होणार आहे.